पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ ८५८/२०१३
दिनांक : १३ / ०९ / २०१३

प्रति,

मा.......................
सदस्य, विधी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

विषय :- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. विधी समितीची सभा दिनांक **२०/०९/२०१३** रोजी आयोजित केलेबाबत.

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **२०/०९/२०१३** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत : १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी १८.

मा.विधी समिती सभा

**कार्यपत्रिका क्रमांक ८**

दिनांक : **२०/०९/२०१३** वेळ : दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **२०/०९/२०१३** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

**अ**) दिनांक १६/०८/२०१३, २३/०८/२०१३ व ०६/०९/२०१३ रोजी झालेल्या (कार्यपत्रिका क्र.६) चा सभावृत्तांत कायम करणे.

**आ**) दिनांक ०६/०९/२०१३ रोजी झालेल्या (कार्यपत्रिका क्र.७) चा सभावृत्तांत कायम करणे.

----------

**विषय क्र.१)** श्री. सतिश कुलकर्णी, सहा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार दिनांक ०२/०७/२०१३ पासून पुढे १ वर्ष कालावधीकरीता मुदतवाढ देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.
(दिनांक २०/०९/२०१३ चे सभेत घेण्याचे निर्णयाप्रमाणे)

**विषय क्र.२)** श्री. ज्ञानेश्वर ढेरे, सहा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार दिनांक २३/०९/२०१३ पासून पुढे १ वर्ष कालावधीकरीता मुदतवाढ देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.
(दिनांक २०/०९/२०१३ चे सभेत घेण्याचे निर्णयाप्रमाणे)

**विषय क्र.३)** मुंबई पुणे रस्त्यावर दापोडी ते पिंपरी चौक कर्ब स्टोन, फुटपाथ, रस्ता दुभाजक इ.देखभाल दुरुस्ती करणे या उपलेखाशिर्षाखाली दापोडी ते निगडी मार्गदर्शक फलक बसविणे व दुरुस्ती करणेकामीचे र.रु.४०,००,०००/-( अक्षरी र.रु.चाळीस लाख फक्त ) पर्यंतचे पुर्वगणनपत्रकास मान्यता देणेबाबत विचार करणे.
(दिनांक २०/०९/२०१३ चे सभेत घेण्याचे निर्णयाप्रमाणे)

**विषय क्र.४)** श्री. गायकवाड भानुदास पांडूरंग, उपजिल्हाधिकारी यांचे सहा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावर प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार १ वर्ष कालावधीकरीता नियुक्ती करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.
(दिनांक २०/०९/२०१३ चे सभेत घेण्याचे निर्णयाप्रमाणे)

**विषय क्र.५)** मुंबई पुणे रस्ता दापोडी ते पिंपरी चौक कर्ब स्टोन, फुटपाथ, रस्ता दुभाजक इ. देखभाल व दुरुस्ती करणेचे र.रु.३५,००,०००/- (अक्षरी र.रु.पस्तीस लाख फक्त ) पर्यंतचे पुर्वगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.
(दिनांक २०/०९/२०१३ चे सभेत घेण्याचे निर्णयाप्रमाणे)

**विषय क्र.६)** श्री.प्रमोद भोसले, मुख्यलेखापाल यांना प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्ती नुसार मुख्यलेखापाल पदावरील नियुक्तीसंदर्भात मे.उच्च न्यायालयामध्ये रिट पिटिशन स्टॅम्प क्र. २३३१७/२०१२ पिं.चिं.मनपा कर्मचारी महासंघ विरुध्द महाराष्ट्र शासन व पिं.चिं.मनपा या दाव्यामध्ये होणा-या अंतिम निर्णयाचे अधीन राहून २३/०७/२०१३ पासून पुढे ०१ वर्ष कालावधी करीता मुदतवाढ देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.
(दिनांक २०/०९/२०१३ चे सभेत घेण्याचे निर्णयाप्रमाणे)

**विषय क्र.७)** अ प्रभाग स्थापत्य विभागाकडील विषयपत्रानुसार निगडी से.क्र.२२ येथील गुरुदत्त उद्यानाचे नुतनीकरण करणे या कामातून अ प्रभागातील इतर उद्यानांची देखभाल दुरुस्तीची कामे करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.
(दिनांक २०/०९/२०१३ चे सभेत घेण्याचे निर्णयाप्रमाणे)

**विषय क्र.८)** मनपाचे बीआरटीएस विभागाकडील विषयपत्रानुसार जुन्या मुंबई पुणे रस्त्यावरील भक्ती-शक्ती चौक येथे बस टर्मिनल विकसित करणेच्या कामाचे सार्वजनिक बांधकाम खाते यांचेकडील सन १२-१३ च्या दरसूचीनुसार पत्रक तयार केले आहे. सदर कामाची अंदाजपत्रकीय र.रु.२,९०,४४,७१०/-( अक्षरी र.रु.दोन कोटी नव्वद लाख चौव्वेचाळीस हजार सातशे दहा फक्त्) इतकी आहे. सदर काम पूर्ण करणेस एकूण १२ महिन्यांचा कालावधी लागणार आहे. सदरचे कामास सन २०१३-१४ मध्ये एकूण २,९०,००,०००/- इतकी तरतूद करणेत आलेली आहे. (पानांक ४८ अ.क्र.१४/१३७) सदर बस टर्मिनलचे क्षेत्रफळ २१०० चौ.मी. असून

त्यामध्ये खालील बाबींचा समावेश आहे. १) बांधकामाचा प्रकार-वीट बांधकाम २) छताचा प्रकार- GI Sheet ३) Flooring - Anti Skid flooring ४) भिंतीस Aluminum Cladding ५) Control Room ६) Ticket Counter ७) Separate Plat form for BRT & Private buses ८) Rest Room for bus Driver ९) Waiting area for passengers १०) Parking for private vehicles ११) Toilet block याकामी येणा-या र.रु.२,९०,४४,७१०/- (अक्षरी र.रु.दोन कोटी नव्वद लाख चौव्वेचाळीस हजार सातशे दहा फक्त) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.
(दिनांक २०/०९/२०१३ चे सभेत घेण्याचे निर्णयाप्रमाणे )

**विषय क्र.९)** मनपाचे बीआरटीएस विभागाकडील विषयपत्रानुसार औंध रावेत रस्त्यावरील मुकाई चौक येथे बस टर्मिनल विकसित करणेच्या कामाचे सार्वजनिक बांधकाम खाते यांचेकडील सन १२-१३ च्या दरसूचीनुसार अंदाजपत्रक तयार केले आहे. सदर कामाची अंदाजपत्रकीय र.रु.१,३०,३५,०००/- इतकी आहे. सदर काम पूर्ण करणेस एकूण १२ महिन्यांचा कालावधी लागणार आहे. सदरचे कामास सन २०१३-१४ मध्ये एकूण २,९०,००,०००/- इतकी तरतूद करणेत आलेली आहे.(पानांक ४८ अ.क्र.१४/१३७) सदर बस टर्मिनलचे क्षेत्रफळ ९२० चौ.मी. असून त्यामध्ये खालील बाबींचा समावेश आहे. १) बांधकामाचा प्रकार-वीट बांधकाम २) छताचा प्रकार- GI Sheet ३) Flooring - Anti Skid flooring ४) भिंतीस Aluminum Cladding ५) Control Room ६) Ticket Counter ७) Separate Platform for BRT & Private buses ८) Rest Room for bus Driver ९) Waiting area for passengers १०) Parking for private vehicles ११) Toilet block याकामी येणा-या र.रु.१,३०,३५,०००/- (अक्षरी र.रु.एक कोटी तीस लाख पस्तीस हजार फक्त) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.
(दिनांक २०/०९/२०१३ चे सभेत घेण्याचे निर्णयाप्रमाणे )

**विषय क्र.१०)** पिंपरी चिंचवड शहराचे सांस्कृतिक आणि कला धोरण मा.महापौर, सन्माननीय पदाधिकारी, शहरातील विविध कला क्षेत्रातील कलावंत आणि सांस्कृतिक संस्था यांच्या कडून प्राप्त झालेल्या सुचना / अभिप्राय विचारात घेऊन तयार करण्यात आले आहे. प्रस्तावा सोबतचे परिशिष्ट अ, ब, क, ड, इ, प, व फ प्रपत्रामध्ये नमुद सांस्कृतिक आणि कला धोरणास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.
(दिनांक २०/०९/२०१३ चे सभेत घेण्याचे निर्णयाप्रमाणे )

**विषय क्र.११)** पिंपरी चिंचवड महानगरपालिका मिळकत वाटप नियमावली २०१३ प्रस्तावा सोबत नमुद केलेप्रमाणे (प्रारुप) तयार करणेत आलेली आहे. त्यास मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**विषय क्र.१२)** पिंपरी मेन पंपहाऊस येथे अधिक क्षमतेचे इलेक्ट्रीक हॉईस्ट बसविणेकामी येणा-या र.रु.१२,५०,०००/- (अक्षरी र.रु.बारा लाख पन्नास हजार फक्त) चे पुर्वगनणपत्रकास प्रशासकीय मान्यता व त्याप्रमाणे काम करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

**विषय क्र.१३)** पिंपळे सौदागर पंपहाऊस येथे अधिक क्षमतेचे इलेक्ट्रीक हॉईस्ट बसविणेकामी येणा-या र.रु.११,६१,०००/- (अक्षरी र.रु.अकरा लाख एकसष्ट हजार फक्त) चे पुर्वगनणपत्रकास प्रशासकीय मान्यता व त्याप्रमाणे काम करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ ८५८/२०१३
दिनांक : १३/०९/२०१३

**टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेट्स) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.**